प्रातःकाल
www.pratahkal.com

विजयादशमी दिनानिमित्त रिपब्लिकन सेनेतर्फे संविधान बचाव यात्रेची वस्ती पातळीवर जनजागरण सभा संपन्न

कल्याण, दि. २५ (वार्ताहर) : रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र राज्य प्रमुख काकासाहेब खंबालकर यांच्या नेतृत्वाखाली दीक्षाभूमी नागपूर येथून सुरू होणाऱ्या संविधान बचाव यात्रा ही संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून ते चैत्यभूमी दादर येथे सहा डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी समाप्त होणार आहे. दरम्यानच्या काळात सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची ज्या जिल्ह्यांमधून संविधान बचाव यात्रा जाणार आहे त्या जिल्ह्यामध्ये जाहीर सभा होणार आहेत.

यात्रेचा आराखडाही तयार करण्यात आला आहे. दिनांक ४ डिसेंबर रोजी ही यात्रा ठाणे येथे येणार आहे. विजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डोंबिवली शहरातील पूर्वकडील स्टेशनलगत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर सकाळी नऊ वाजता भारतीय बौद्ध महासभा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीतर्फे त्रिसरण पंचशील घेऊन समता सैनिक दलाने महामानवास मानवंदना दिली. या वेळेस रिपब्लिकन सेना, रिपब्लिकन युवा सेनेच्या कार्यकर्त्यांकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मारकास भव्य असा पुष्पहार अर्पण करून डोंबिवलीतील विविध कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. संविधान बचाव यात्रेचे नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन डोंबिवली पश्चिमेकडील सिद्धार्थ नगर,अण्णा नगर,महात्मा फुले नगर,शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय, डोंबिवली पूर्वेकडील क्रांतीनगर, शेलार नाका येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तीपातळीवर असणाऱ्या पुतळ्यांना त्रिसरन पंचशील घेऊन पुष्पहार अर्पण करून झाल्यावर येणाऱ्या संविधान बचाव यात्रे बद्दल सभा घेऊन जनजागरण करण्यात आले. तसेच सिद्धार्थ नगर मधील पुतळ्यांचे नूतनीकरण करण्यात आले. या वेळेस वस्ती पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह बघण्यास मिळाला. तरी ४डिसेंबर रोजी ठाणे येथे येणाऱ्या संविधान बचाव यात्रेस मोठ्या संख्येने सामील ठाणे जिल्हा निमंत्रक तथा कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष (पँथर)आनंद नवसागरे यांनी केले आहे.

कल्याणात जरीमरी नाल्यावर बनणार पादचारी पूल

कल्याण, दि. २५ (वार्ताहर) : कल्याण पश्चिमेतील मल्हार नगर परिसरात असणाऱ्या जरीमरी नाल्यावर आता पादचारी पूल बांधण्यात येणार असल्याने स्थानिकांना मोठा फायदा होणार आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांच्या आमदार निधीतून हा पादचारी पूल बांधण्यात येणार असून दसऱ्याच्या मुहूर्तावर या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. या पादचारी पुलामुळे संतोषी माता रोड, जोशीबाग, मल्हार नगर, काळा तलाव आदी परिसरातून स्टेशनला जाणाऱ्यांच्या वेळेत आणि त्रासात मोठी बचत होणार असल्याने पादचारी पुलावरून ये जा करणार्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. कल्याण पश्चिमेच्या मल्हार नगर परिसर, आचिव्हर्स कॉलेजच्या पाठीमागे हा पूल बांधण्यात येणार आहे. येथील स्थानिक रहिवाशांसह त्याच्या आजूबाजूच्या भागातून स्टेशनला जाणाऱ्यांचा मोठा त्रास वाचणार आहे. या पुलाअभावी स्टेशनकडे जाणाऱ्या लोकांना मोठा वळसा घालून जावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी सध्याचा मार्ग काहीसा असुरक्षित असल्याने याठिकाणी पादचारी पूल बांधण्याची नितांत गरज होती. पावसाळ्याच्या काळात तर या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना ये - जा करण्यासाठी अनेक अडचणी आणि गैरसोयींचा सामना करावा लागायचा. त्यामुळे माजी नगरसेवक श्रेयस समेळ यांनी या जरीमरी नाल्यावर पादचारी पूल बांधण्यासाठी आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार आमदार भोईर यांनी आपल्या आमदार निधीतून या पादचारी पुलाला निधी उपलब्ध करुन दिला. दसऱ्याच्या मुहूर्तावर आमदार विश्वनाथ भोईर शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या हस्ते या पादचारी पुलाच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक श्रेयस समेळ, अचिव्हार्स कॉलेजचे महेश भिवंडीकर शाखाप्रमुख संतोष घोलप तसेच शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी व आदी मान्यवर उपस्थित होते. 'दरम्यान स्टेशनला जाणाऱ्या नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने हा पादचारी पूल महत्त्वाचा दुवा ठरेल. आणि लोकांच्या वेळेत त्यामुळे नक्कीच बचत होईल असा विश्वास यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केला आहे.

विविध मागण्यांसाठी वाडा तालुका आदिवासी संघर्ष समितीचा भव्य मोर्चा

वाडा, दि. २५ (वार्ताहर) : आदिवासी, शेतमजूर, शेतकरी, स्थानिक भूमिपुत्र यांना आपल्या जागा-जमिनी व व्यवसायापासून बेदखल करुन त्यांना हद्दपार करण्याचे धोरण सरकारने आखले आहे. भारतीय संविधानाने सर्वसामान्य व तळागाळातील सर्वसामान्य लोकांना समान अधिकार दिले असताना शासन आपले मनमानी धोरण राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. आज न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कमी होत चालला आहे. अनेक जाती-जमातींमध्ये वेगवेगळ्या पद्धतीच्या माध्यमातून समाजा समाजामध्ये वेग-वेगळ्या जातीधर्माच्या नावाने आरक्षणाचे मुद्दे घेऊन आपापसांत भांडणे लावली जात आहेत. या सर्व शासनाच्या मनमानी धोरणाप्रमाणे लोकांच्या विरोधात कायदे करण्याचा शासन भडीमार करीत आहे. जो कायदा सर्वसामान्य लोकांच्या हिताचा असणे आवश्यक असताना मुठभर धनदांडग्या लोकांच्या हितासाठी त्या कायद्यामध्ये बदल केला जात आहे. याचा निषेध करण्यासाठी वाडा तालुका आदिवासी संघर्ष समितीच्या वतीने बुधवारी (दि.२५) खंडेश्वरीनाका येथे रास्ता रोको करून तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

धनगर (धनगड) समाजाला आदिवासी समाजाच्या कोट्यातून आरक्षण देण्यात येऊ नये. पेसा भरती त्वरीत अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र शासनाने ६ सप्टेंबर २०२३ चा कंत्राटी नोकर भरती करण्यासाठी काढलेला शासन निर्णय त्वरीत रद्द करणे. महाराष्ट्र राज्यातील ६२००० सरकारी शाळांचे खाजगीकरण पूर्णपणे बंद करा. दि. ६ जुलै २०१७ च्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालांचा सन्मान राखून १७ पदांची सरकारी नोकरभरती त्वरीत करणे. बोगस आदिवासींची चौकशी करुन तात्काळ निलंबन करावे. भूमिहीन कुटूंबाच्या घराखालील जागा त्वरीत त्या कुटूंबाच्या नांवे करणे, भूमिहीन आदिवासी कुटूंबाला ५ एकर जागा जमिन त्वरीत वाटप करणे. वनदावे आदिवासींच्या नांवे करणे, न नोंदविलेल्या कुळांची पिक पाहणी सदरी नोंद करण्यात यावी. पेसा कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करावी, बिंदुनामावलीची अंमलबजावणी त्वरीत करावी, एमएसईबीचा भोंगळ कारभार थांबवून जनतेला न्याय द्यावा तसेच खोटी बिले आकारणी त्वरीत थांबवावी, अशा विविध मागण्या घेऊन आदिवासी संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयाला धडक दिली.

एक तीर एक कमान, खरे आदिवासी एक समान... आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाचे बापाचे... आदिवासी बांधवा जागा हो, संघर्षाचा धागा हो... आदिवासी एकतेचा विजय असो... अशा विविध घोषणांनी शहर दुमदुमले होते. याप्रसंगी संतोष साठे, अनंता वनगा, मृणाली नडगे, पूजा चव्हाण, अर्चना भोईर, बाळा बराठे, यतीन राऊत, योगेश गवा, भास्कर दळवी, सुरेश पवार, राजू दळवी यांच्यासह भास्कर दळवी यांनी मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी तहसीलदार भाऊसाहेब अंधारे व पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी व्यासपीठावर येऊन मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्वीकारून पुढील कारवाईसाठी निवेदन वरिष्ठ्यांना पाठविण्याचे आश्वासन तहसीलदार अंधारे यांनी दिले. दरम्यान, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे यांनी स्वतः वाड्यात हजर राहून मोर्चावर नियंत्रण ठेवले. पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांच्यासह इतर दहा अधिकरी, ६५ पोलीस कर्मचारी, २० वाहतूक निरीक्षक, २२ होमगार्ड, १० स्ट्राईकिंग असा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे माझे अशील श्री. मोहनलाल पेमाराम चौंधरी व श्रीम. कमला मोहनलाल चौंधरी यांच्या वतीने देण्यात येते की, ते दुकान क्र. ९, बी विंग, तळ मजला, बिल्डींग वीणा सुर श्याम कॉम्प्लेक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड म्हणून ज्ञात, गाव आचोळे, वसंत नगरी, नालासोपारा (पूर्व), तालूका वसई, जिल्हा पालघर येथील जमिनीवरील बांधकामित सर्व्हे क्र. १४ (१०), हिस्सा क्र. ६, सि. क्र. १९(३०), सि. क्र. २०(३१), हिस्सा क्र. २, अनु. क्र. २१(३२), एस. क्र. ५७ (३६४), एच. क्र. ६/४ क्षेत्रफळ मोजमापित १३० चौ. फूट (चटई क्षेत्रफळ) अर्थात १४.४९ चौ. मीटर (बिल्ट-अप क्षेत्रफळ) धारक मालमत्तेचे मालक आहेत व विभिन्न क्र. ९२१ ते ९२५ धारक सदर दुकान मूळ शेअर प्रमाणपत्र धारक क्र. १८५ च्या रु. ५० प्रत्येकीच्या दर्शनी मूल्याचे सोसायटीचे पाच (५) शेअर्स धारक असून सदर करार घर साफ करताना गहाळ झाले होते.
श्री. मोहनलाल पेमाराम चौंधरी व श्रीम. कमला मोहनलाल चौंधरी यांनी आचोळे पोलीस स्टेशन येथे गहाळ अहवाल क्र. ३२४४६-२०२३ दि. २५.१०.२०२३ धारक तक्रार दाखल केली होती.
त्यामुळे मी याद्वारे कोणाही व्यक्तीस सदर दुकान संबंधात कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास त्या व्यक्तींचे दावे वा आक्षेप सदर प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत वरील निर्देशित वकील कार्यालय यांच्या पत्त्यावर वा वकील कार्यालय येथे संपर्क करणे आवश्यक आहे.
श्री. मोहनलाल पेमाराम चौंधरी व
श्रीम. कमला मोहनलाल चौंधरी
काऊंटसाईन
श्री. अवनीश कुमार तिवारी
दि. २६.१०.२०२३ (वकील उच्च न्यायालय)
दुकान क्र. २१, जय विजय ग्रीन, न्यु लिंक रोड, नालासोपारा (पू), तालूका वसई, जिल्हा पालघर.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, श्री. जितेंद्र उत्तमचंद मेहता व श्रीम. सारिका जितेंद्र मेहता हे फ्लॅट क्र. ए/२०३, दुसरा मजला, भाईंदर त्रिशुळ को-ऑप. हा. सो. लि., नोंदणीकरण क्र. टीएनए/(टीएनए)/एचएसजी/(टीसी)/६५१६/१९९३-१९९४, दि. २४.१२.१९९३ अंतर्गत देवचंद नगर, ६० फूट रोड, शांती नगर रोड, भाईंदर (पश्चिम), तालूका व जिल्हा ठाणे ४०१ १०१ येथील संयुक्त मालक/ सभासद आहेत. दुसरे करार श्रीम. कांताबेन सुरजमाल शाह व श्रीम. जया टी. पुनमिया व श्री. जितेंद्र टी. पुनमिया यांच्या दरम्यान विक्री करार दि. ०३.११.१९९८ रोजी केले होते, घोषणा करार श्रीम. जया टी. पुनमिया व श्री. जितेंद्र टी. पुनमिया यांनी उप-निबंधक कार्यालय यांच्यासह ठाणे-७ दस्तावेज क्र. ६१९९/२००८ दि. १५.०९.२००८ रोजी नोंदणीकृत केले होते. व सदर सोसायटीने सदर श्रीम. जयवंती टी. पुनमिया व श्री. संजय टी. पुनमिया यांच्या नावे दि. ०९.११.१९९८ रोजी हस्तांतरण केले. कौटुंबिक सेटलमेंट करार दि. ०२.१२.२००२ श्री. संजय टी. पुनमिया पहिल्या भागाचे हस्तांतरक म्हणून संदर्भित व श्री. जितेंद्र टी. पुनमिया यापुढे दुसऱ्या भागाचे हस्तांतरिती म्हणून यांच्या दरम्यान व श्रीम. जयवंती टी. पुनमिया यापुढे तिसऱ्या भागाचे पुष्टी पक्ष म्हणून संदर्भित. व भाईंदर त्रिशुळ को-ऑप. हा. सो. लि. चे सभासद व हस्तांतरक व पुष्टी पक्ष म्हणून संदर्भित. दुसऱ्या भागाचे पक्ष म्हणून सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. हस्तांतरिती हे भाऊ आहेत व हस्तांतरक हा मुलगा असून पुष्टी पक्ष अनुक्रमे सदर पक्षकार यांचे एकमेकांचे रक्ताचे नाते आहे. व कौटुंबिक व्यवस्थेच्या व/वा सेटलमेंट अनुसार पहिल्या भागाचे पक्षकार म्हणून ते सदर फ्लॅटमधील ५०% हक्क, अधिकार व हितसंबंध हस्तांतरण करत आहेत व सदर शेअर्स हस्तांतरिती यांच्या नावे करत आहेत व एकूण रु. १,२५,५००/- त्यांचे मूल्य व अहवाल आहेत. व याद्वारे घोषित केले जाते की काही दस्तावेजांमध्ये निर्देशित नाव लेखी स्वरूपात श्रीम. जयवंती टी. पुनमिया म्हणून आहे. व दस्तावेज श्रीम. जयवंती टी. पुनमिया व श्रीम. जया टी. पुनमिया हे एक असून सदर व्यक्ती अर्थात श्रीम. जया टी. पुनमिया आहेत. व करारामध्ये चुक होऊन श्री. जितेंदर उत्तमचंदजी मेहता व श्रीम. सारिका जितेंदर मेहता यांचे अचूक नाव श्री. जितेंद्र उत्तमचंद मेहता व श्रीम. सारिका जितेंद्र मेहता असे आहे.
कोणाही व्यक्तीस, बँक्स, वित्तीय संस्था, वैयक्तिक, कंपनी संस्था आदी यांना दस्तावेज पुरावे यांच्यासह लेखी स्वरूपात कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास कोणतेही दावे असल्यास त्यांनी सदर सूचनेच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणत्याही व्यक्तींचे दावे काही असल्यास सदर फ्लॅट संबंधात तर गृहित धरले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.
दिलीप के. पांडे
दि. २६.१०.२०२३ (वकील उच्च न्यायालय)
बी/१०९, भाईदया नगर, बी बिल्डींग, नवघर रोड, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०५.

जाहीर सूचना

सूचना देण्यात येते की, दिवंगत श्री. प्रेमजी तोकरसी देढिया हे फ्लॅट क्र. सी/३०४, तिसरा मजला, बिल्डींग सुंदरम सोसायटी श्री सुंदरम को-ऑप. हा. सोसायटी लि. म्हणून ज्ञात, छेडा पार्क, आचोळे तलावजवळ, नालासोपारा (पू), पालघर ४०१ २०९ येथील मालक होते, श्री. प्रेमजी तोकरसी देढिया यांचा मृत्यू दि. ३०.१०.२०१९ रोजी झाला व त्यांच्या पत्नीचा मृत्यू दि. २०.११.२००९ रोजी झाला, त्यांच्या मागे त्यांची तीन मुले नावे १. श्री. हिरालाल प्रेमजी देढिया, २. श्री. जेठालाल प्रेमजी देढिया व ३. श्री. परेश कुमार प्रेमजी देढिया हे आहेत. सदर १. श्री. हिरालाल प्रेमजी देढिया यांनी त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध श्री. जेठालाल प्रेमजी देढिया व श्री. परेश कुमार प्रेमजी देढिया यांच्या नावे सदर फ्लॅट संबंधात सरेंडर केले आहेत. व नोंदणीकृत रिलीज करार दस्तावेज क्र. वसई-३/८९३०/२०२३, दि. २५.०४.२०२३ अंमलात आणले होते. त्यानंतर श्री. जेठालाल प्रेमजी देढिया व श्री. परेश कुमार प्रेमजी देढिया हे सदर फ्लॅटचे परिपूर्ण मालक बनले. सर्व व्यक्तींना व त्यांचे कायदेशीर वारस यांना सूचित करण्यात येते की, जर कोणालाही सदर फ्लॅट संबंधात कोणतेही हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी कृपया मला मूळ दस्तावेज पुरावे यांच्यासह सदर प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सूचित करणे आवश्यक आहे, अन्यथा सदर दावे, काही असल्यास ते विचारात घेतले जाणार नाहीत व अधित्यागीत व परित्यागीत मानले जातील.
सतिष एस. चौंबे
दि. २६.१०.२०२३ (वकील उच्च न्यायालय)
बी/१२३, ओस्वाल ओर्नेट बिल्डींग क्र. २, जेसल पार्क, भाईंदर (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०५.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे आम जनतेस आमचे अशील, मेहमूद अब्दूल गफूर शेख हे फ्लॅट क्र. ३०७, तिसरा मजला, बी विंग, बिल्डींग क्र. ३, बिल्डींग श्री खारवा सीमेन्स को-ऑप. हा. सो. लि. म्हणून ज्ञात, सागर मंथन, पुजा नगरजवळ, मीरा रोड (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०७ (यापुढे सदर फ्लॅट म्हणून संदर्भित) येथील मालमत्तेचे बोनाफाईड सभासद आहेत.
सदर फ्लॅट संयुक्तरित्या १. श्री. अब्दूल गफूर अब्दूल करिम शेख २. मुर्तुझा बी अब्दूल गफूर शेख यांच्याद्वारे त्यांच्या स्वतःच्या नावे खरेदी केला होता, ज्याअर्थी दिवंगत मुर्तुझा बी अब्दूल गफूर शेख यांचा मृत्यू दि. २०.१०.२०२१ रोजी झाला, तसेच दिवंगत श्री. अब्दूल गफूर अब्दूल करिम शेख यांचा मृत्यू दि. १९.१२.२०२२ रोजी झाला होता, त्यांच्या मागे १. मेहमूद अब्दूल गफूर शेख (मुलगा), २. निलोफार सलिम सैंयद (मुलगी) ३. फरिदा फिरोझ सैयद (मुलगी), ४. साफिया हारून शेख (मुलगी) ५. ताहिरा यासिन शेख (मुलगी) ६. रहिमा अबुबाकर शेख (मुलगी) हे केवळ कायदेशीर वारस आहेत.
ज्याअर्थी वारस १. निलोफार सलिम सैंयद २. फरिदा फिरोझ सैयद, ३. साफिया हारून शेख ४. ताहिरा यासिन शेख, ५. रहिमा अबुबाकर शेख यांनी सदर फ्लॅट संबंधात आमचे अशील मेहमूद अब्दूल गफूर शेख यांच्या नावे त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध रिलीज्ड व रिलींक्वीश्ड केले व रिलीज करार दि. ०३.०१.२०२३ अंतर्गत नोंदणीकरण टीएनएन-७-१६८-२०२३ अंतर्गत आहेत. आमचे अशील हे सदर फ्लॅटचे सध्याचे मालक आहेत.
पुढे सूचित करण्यात येते की, शेअर प्रमाणपत्र क्र. ०४७१ ते ०४७५ धारक विभिन्न क्र. ०४७१ ते ०४७५ सदर फ्लॅट संबंधात आहेत व सोसायटीद्वारे जारी केले होते ते गहाळ/ हरवले आहेत व सापडत नाही आहेत.
त्यानुसार, आमचे अशील यांनी दस्तावेज गहाळ तक्रार नया नगर पोलीस स्टेशन येथे अहवाल क्र. ३२३८९-२०२३ दि. २४.१०.२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे.
सर्व व्यक्तींना सदर फ्लॅटमध्ये कोणतेही दावे, हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच विक्री, भेट, गहाण, भाडेकरार, जप्ती वा कोणत्याही स्वरूपात काही असल्यास सदर संबंधात आवश्यक पुरावे दस्तावेज सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरित यांना सूचित करावे अन्यथा सर्व सदर हक्क, अधिकार, हितसंबंध व दावे आदी काही असल्यास ते अधित्यागीत व परित्यागीत मानले जातील व सोसायटी अर्जदार सभासद यांना ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया करेल.
(राजेंद्र सिंह राजपुरोहित)
वकील उच्च न्यायालय, मुंबई
दुकान क्र. ९, अस्मीता ओरिएन्ट सीएचएस लि., अस्मीता क्लबजवळ, मीरा रोड (पू), ठाणे : ४०१ १०७.

Public Notice for Loss of Share Certificate

Notice is hereby given that the Certificate(s) for the under mentioned Equity Shares of the Company have been lost / misplaced and the holder(s) / purchaser(s) of the said Equity Shares have applied to the **LLOYDS METALS AND ENERGY LIMITED** to issue duplicate Share Certificate(s). Any person who has a claim in respect of the said Shares should lodge the same with the Company at its Registered Office within 21 days from this date else the Company will proceed to issue duplicate certificate(s) to the aforesaid applicants without any further intimation.
Folio No. : **0120456**
Name of Shareholder : **R AJENDRA MULCHAND DHULLA**
No of Shares : **2000**
Distinctive Nos. from **3529331 to 3531330**
Certificate Nos. : **2900**
RAJENDRA MULCHAND DHULLA **Date : 23-10-23**

फॉर्म ए
जाहीर घोषणा
(भारतीय दिवाळखोरी व कर्जबाजारीपणा (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, 2016 च्या विनियमन 6 अंतर्गत)

श्री साईनाथ लंड अॅन्ड डेव्हलोपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या धनकोंचे लक्ष केंद्रित करण्याकरिता

संबंधित विवरण

1.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	श्री साईनाथ लँड अॅन्ड डेव्हलोपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड
2.	कॉर्पोरेट ऋणकोची एकीकरण तारीख	दि. 12 जानेवारी, 2011
3.	कोणते कॉर्पोरेट ऋणको एकीकरण/ नोंदणीकृत आहेत अशांचे प्राधिकरण	कंपनी कायदा, 1956
4.	कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट आयडेंटिटी क्रमांक/ मर्यादित दायित्व आयडेंटिफिकेशन क्रमांक	U45400MH2011PTC212231
5.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व कॉर्पोरेट ऋणको यांचे प्रमुख कार्यालय (जर काही असल्यास)	दुकान क्र. यूजी 109, ड्रिम्स-दि मॉल, एलबीएस मार्ग, भांडुप (प), मुंबई 400 078, महाराष्ट्र. **कॉर्पोरेट/ प्रमुख कार्यालय :** 8, साईकृपा कॉम्प्लेक्स टिळक रोड, नाशिक रोड, मुक्तीधाम समोर, नाशिक 422 101 महाराष्ट्र.
6.	कॉर्पोरेट ऋणकोंचे दिवाळखोरी प्रारंभ तारीख	20 ऑक्टोबर, 2023
7.	कॉर्पोरेट ऋणकोंचे दिवाळखोरी प्रारंभ तारीख	17 एप्रिल, 2024
8.	दिवाळखोरी विशेष कार्यरत असलेल्या अंतरिम ठराव व्यावसायिक यांचे नाव व नोंदणीकरण क्रमांक	मनिष मोतीलाल जाजू आयबीबीआय नोंदणीकरण क्र. आयबीबीआय/आयपीए-001/आयपी-पी00034/2016-17/10087
9.	मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या अंतरिम ठराव व्यावसायिक यांचा पत्ता व ई-मेल	एम एम जाजू अॅन्ड कं. डी-502, नीलकंठ बिझीनेस पार्क, विद्याविहार पश्चिम, मुंबई 400 086, ईमेल mmjaju76@gmail.com
10.	अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्यासह संबंधितांचा पत्ता व ई-मेल आयडी	एम एम जाजू अॅन्ड कं. डी-502, नीलकंठ बिझीनेस पार्क, विद्याविहार पश्चिम, मुंबई 400 086, ईमेल cirp.sainath@gmail.com
11.	दाव्यांच्या सादरीकरणाकरिता अंतिम तारीख	दि. 05 नोव्हेंबर, 2023
12.	अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याद्वारे जारी मंजूर 21 च्या उप-अनुच्छेद (6ए) च्या खंड (बी) अंतर्गत जर काही असल्यास धनकोंचे वर्ग	आयबीसी कोडच्या अनुच्छेद 5(8) च्या खंड (एफ) अनुसार रिअल इस्टेट प्रोजेक्ट अंतर्गत आवंटी
13.	वर्गामध्ये धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कायद्याच्या ओळख असलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	1. विठ्ठल एम दहाके (आयबीबीआय/आयपीए-002/ आयपी-एन00117/2017-18/11926) 2. हेमंत मेहता (आयबीबीआय/आयपीए-001/आयपी-पी00027/2016-17/10060) 3. अमित कारिया (आयबीबीआय/आयपीए-001/आयपी-पी02600/2021-2022/13969)
14.	ए) संबंधित प्रपत्र व बी) उपलब्ध प्राधिकृत प्रतिनिधींचा तपशील	वेब लिंक https://ibbi.gov.in/home/downloads

***अंतरिम ठराव विशेषज्ञ यांच्या नियुक्तीचे आदेश राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ (एनसीएलटी) यांच्याद्वारे दि. 20 ऑक्टोबर, 2023 रोजी पाठविले आहेत. अंतरिम ठराव दि. 22 ऑक्टोबर, 2023 रोजी केले आहेत. त्यानुसार, दावे सादरीकरणाकरिता वेळ दि. 22 ऑक्टोबर, 2023 पासून 14 दिवस असेल.**
सूचना याद्वारे देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण यांनी **श्री साईनाथ लँड अॅन्ड डेव्हलोपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया प्रारंभ तारखेच्या आदेशान्वये दि. 20 ऑक्टोबर, 2023** रोजी प्रारंभ करण्याचे आदेश दिले आहेत.
श्री साईनाथ लँड अॅन्ड डेव्हलोपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांनी याद्वारे बाब क्र. 10 संबंधात नमूद कॅम्प कार्यालय पत्ता येथे अंतरिम ठराव प्रोफेशनलकरिता दि. 05 नोव्हेंबर 2023 रोजी वा पूर्वी पुराव्यांसह त्यांचे दावे सादर करावे.
वित्तीय धनको नांनी केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यांचे दाव्यांचे पुरावे सादर करावे. सर्व अन्य धनको यांनी त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तीशः, पोस्टद्वारे वा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करावे.
वित्तीय धनको हे वर्ग संबंधात सूचित प्रवेश क्र. 12 संबंधात त्यांच्या आवडीनुसार निर्देशित प्राधिकृत प्रतिनिधी यांच्यामुळे वर्ग होमबायर्स यांच्या प्राधिकृत सादरीकरणाच्या संबंधात एन्ट्री क्र. 13 सूचीत दिवाळखोरी विशेषज्ञ यांच्याकडून वर्ग. सादरीकरण करण्यास अपयशं तसेच दाव्यांचे चुकीचे पुरावे सादर केल्यास त्यावर दंड आकारण्यात येईल.
सही/-
मनिष एम. जाजू
अंतरिम ठराव विशेषज्ञ
श्री साईनाथ लँड अॅन्ड डेव्हलोपमेंट (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रकरणामध्ये आयबीबीआय नोंदणीकरण क्र. : आयबीबीआय/आयपीए-001/आयपी-पी00034/2016-2017/10087
एएफए वैधता 17.01.2024 पर्यंत
दि. 25 ऑक्टोबर, 2023
ठिकाण : मुंबई

जाहीर सूचना

सूचित करण्यात येते की, माझे अशील शेखर शरदचंद्र हलबे व शिरीष शरदचंद्र हलबे हे शरदचंद्र बळवंत हलबे (दिवंगत बळवंत विष्णू हलबे यांचा मुलगा जे मूळ सभासद होते) यांचे कायदेशीर वारस म्हणून मालकीचा त्यांचा फ्लॅट नावे फ्लॅट क्र. जी/८, ३ रा मजला, दादर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, शारदाश्रम, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८ ही मालमत्ता विक्री करण्यास इच्छुक आहेत. जर सदर संबंधात कोणालाही आक्षेप असल्यास त्यांनी मला सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा.
दिनांक : २६.१०.२०२३
वकील अरूण जी. देशमुख दुकान क्र. १, विनायक दर्शन अपार्टमेंट, गणेश पेठ लेन, दादर (प), मुंबई ४०० ००२८.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे माझे अशील यांच्या वतीने देण्यात येते की, श्रीम. भावना निमेश शेठ व श्री. निमेश जवाहर शेठ हे फ्लॅट क्र. १०, २ रा मजला, बिल्डींग तळ + ३ मजले लिफ्ट विना समाविष्ट बिल्डींग राम बिल्डींग म्हणून ज्ञात व शानमुखा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. व प्लॉट क्र. २५ व २६, रिफल रेंज, गेलदा नगर घाटकोपर (प), मुंबई ४०० ०८६ मोजमापित क्षेत्रफळ मोजमापित ३६० चौ. फूट चटई क्षेत्रफळ धारक जमिन धारक सीटीएस क्र. ७६, गाव घाटकोपर तालूका कुर्ला येथील नोंदणीकरण जिल्हा मुंबई उपनगरीय जिल्हा येथील मालमत्तेचे मालक आहेत व १ ले विक्रीचे मूळ करार बिल्डर व श्री एस. वेंकट चालम (खरेदीदार) यांच्या दरम्यान, २ रे मूळ विक्रीचे करार दि. २४.०७.१९९० रोजी श्री एस. वेंकटचालम व श्री. केतन चंद्रकांत दवे (खरेदीदार) यांच्या दरम्यान अंमलात आणले, ३ रे विक्रीचे मूळ करार दि. ०६.०५.२०१० रोजी श्री. केतन चंद्रकांत दवे व श्रीम. भावना निमेश शेठ व निमेश जवाहर शेठ (खरेदीदार) यांच्या दरम्यान अंमलात आणले होते व वरील १ ले मूळ करार माझे अशील श्री. निमेश जवाहर शेठ यांच्याकडून गहाळ झाले आहेत/हरवले आहेत. व गहाळ तक्रार श्री. निमेश जवाहर शेठ यांच्याद्वारे पोलीस स्टेशन घाटकोपर पश्चिम येथे गहाळ अहवाल क्र. ९५७२०-२०२३ अंतर्गत दि. २२.१०.२०२३ रोजी दाखल केली.
जर कोणाही व्यक्तीस वरील सदर फ्लॅट व कोणत्याही प्रकारचे कायदेशीर वारस यांच्या विक्री संबंधात कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास त्यांनी याद्वारे माझे अशील वा मला वा त्यांचे काऊन्सेल यांना सदर दावे तसेच कोणाही व्यक्तीचे दावे, आक्षेप तसेच हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास तसेच वरील सदर अर्जदार मालमत्तेमधील वा कायदेशीर वारस/ विक्री आदींच्या मार्फत काही असल्यास सदर योग्य पुरावे यांच्यासह १५ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणतेही आक्षेप वा दावे गृहित धरले जाणार नाहीत.
सही/-
सुशील पाल
दि. २६.१०.२०२३ (वकील उच्च न्यायालय)